# कार्यकारी अभियंता (प.उ.), इमारत परवानगी कक्ष, बृहन्मुंबई क्षेत्र,
**खोली क्र.२१,तळ मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व ),मुंबई -४०० ०५१.**

---

जा.क्र.एम.एच./का.अ./इ.प.क.(बृ.क्षे.)प्रा/ 2068/२०२४
दिनांक:- - 4 SEP 2024

E.2767315
ITC Cell,
M. M. & A. D. Authority
Inward No.: 3117
Date: 05.09.24

**प्रति,**
सह दुय्यम निबंधक बोरिवली -२,
कांदिवली टेलिफोन एक्सचेज,
कांदिवली पोलीस लाईन, मागाठाणे,
कांदिवली (प.), मुंबई-४०० ०७१.

**विषय:-** भूखंड क्र. ११७ ओम साई सदन गृह. संस्था., आर.एस.सी.-३७, गोराई-२, बोरिवली (प.), मुंबई-४०० ०९२ या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत...

**संदर्भ:-** १. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग निर्णय क्र. टीपीएस-१८२०/अ नं.२७/प्र.क्र.८०/२०नवि-१३ दि.१४.०१.२०२१.
२. मुंबई मंडळाचे नाहरकत प्रमाणपत्र क्रमांक सीओ/एमबी/आरईई/एनओसी/एफ-२६१०/२६१०/२०२२ दि.२१.१०.२०२४.
३. या कार्यालयाचे IOA पत्र क्र. MH/EE/BPCell/GM/MHADA-७१/६०२/२०२१ दि.०४.०३.२०२१.
४. या कार्यालयाचे पत्र क्र. २९३३ दि.१४.०८.२०२४.
५. मे. श्री साई आकार सिविल इन्फ्रा प्रा.लि. यांचे दि. ०३.०९.२०२४ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाला अनुसरुन संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये विषयांकित प्रकल्पाकरिता विकासकास इमारत परवानगी कक्षाकडे भरणा करावण्याच्या ८६१.३२ चौ.मी. (निवासी वापर) फंजिबल क्षेत्रफळाकरिता अधिमुल्य रकमेवर ५० % सुट देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने संस्था / विकासकास संदर्भ क्र. २ अन्वये दि. १४.०१.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्यात आलेले आहे. दि.१४.०१.२०२१ रोजीच्या शासन निर्णयामधील मुद्दा क्र. ब मधील अ.क्र. IV मध्ये खालील प्रमाणे नमुद आहे.

" जे प्रकल्प या योजनेत सहभागी होतील त्या प्रकल्पांची अथवा प्रकल्पांच्या ज्या भागासाठी सवलत घेतली आहे त्याची यादी, महानगरपालिका आयुक्त / नगरपरिषद अथवा नगरपंचायत मुख्याधिकारी / जिल्हाधिकारी / नियोजन प्राधिकरण यांच्यामार्फत माहितीकरिता मुद्रांक नोंदणी कार्यालयास कळवावी लागेल"

उपरोक्त नमुद मुद्याकरिता विकासकाने दि.०३.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये एकूण १६ ग्राहकांचे मुद्रांकाचा संपूर्ण खर्च विकासकामार्फत करण्यात येणार आहे, त्यापैकी ५४३.९३ चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळाकरिता १० लाभार्थी ग्राहकांचे मुद्रांक शुल्क भरलेले असून त्याबाबतचे प्रमाणपत्र व सुची क्र.२ च्या यादीपैकी या पत्राव्दारे सह दुय्यम निबंधक,

बोरिवली क्र.२, ग्राहकाची यादी अग्रेषित करण्यात येत आहे. तसेच उर्वरित ६ निवासी वापर लाभार्थी ग्राहकाकरिता विकासकाने राखीव ठेवलेल्या सदनिकांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | गाळा क्र. | बांधकाम क्षेत्रफळ चौ.मी. | बांधकाम क्षेत्रफळ चौ.फुट |
|---|---|---|---|
| निवासी वापर | | | |
| १. | १७०२ | ४३.५३ | ४६८.५६ |
| २. | १९०२ | ४७.२९ | ५०९.०३ |
| ३. | १९०४ | ४९.५० | ५३२.८२ |
| ४. | २००१ | ७२.४१ | ७७९.४२ |
| ५. | २००२ | ४३.५३ | ४६८.५६ |
| ६. | २००३ | ६५.२७ | ७०२.५७ |
| **निवासी वापर (अ)** | | **३२१.५३** | **३४६०.९५** |

उपरोक्त नमुद माहिती ही विकासकाने या कार्यालयात सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे देण्यात येत आहे याची कृपया नोंद घ्यावी.

शासनाच्या संदर्भिया शासन निर्णय क्र. १ च्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की,वरील तक्त्यात दर्शविलेल्या सदनिकांसाठी विकासकाने बांधकाम क्षेत्रफळापोटी आकारण्यात येणा-या अधिमुल्याच्या दरात सुट घेतली असून, सदर सदनिकांच्या नोंदणीवेळी विकासक, मे. श्री. साई आकार सिव्हिलिन्फ्रा इंडिया प्रा.लि., ग्रुप यांच्या तर्फे मुद्रांक शुल्काचा भरणा करणे अपेक्षित आहे. वर नमुद सदनिकांचे रजिस्ट्रेशन / नोंदणी करतेवेळी आपल्या विभागातर्फे त्याची खातरजमा करण्यात यावी.

सदर बाब माहिती व उचित कार्यवाही करिता सादर.

आपला विश्वासू,

**सोबत :-** वरील प्रमाणे.

**कार्यकारी अभियंता (प.उ.)**
**इमारत परवानगी कक्ष (बृ.क्षे.)/ प्रा.**

**प्रत :-** १. नोंदणी महानिरिक्षक तथा मुद्रांक नियंत्रक, तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, पुणे - ४११००१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. नोंदणी उपमहानिरिक्षक, मुंबइ विभाग, मुंबई, डी.डी. बिल्डींग, तळमजला, जुने जकात घर, शहीद भगतसिंह मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

३. मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी, माहिती व संचार तंत्रज्ञान कक्ष, प्राधिकरण यांना माहितीकरिता व विकासकाने सादर केलेल्या १६ लाभार्थी ग्राहकांचे प्रमाणपत्र तसेच सूची क्र. २ ची यादी म्हाडाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत. सोबत :- सॉफ्ट कॉपी.

४. अध्यक्ष / सचिव, भुखंड क्र. ११७, ओम सदन गृह.नि.संस्था.मर्या., आर.एस.सी.-३७, गोराई-२, बोरिवली (प.), मुंबई-४०० ०९२ यांना माहितीसाठी.

५. संस्थेचे अधिकृत सर्व्हेक्षक, मे. शिल्प असोसिएटस, ३रा मजला, ३१७, ई-स्क्वेअर, सुभाष रोड, विले पार्ले (पू.), मुबई-४०० ०५७ यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.